**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**
**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**
**कार्यपत्रिका क्र. १२**
**सभावृत्तांत**

दिनांक :- २९/२/२०१६ वेळ :- दु. १२.१५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दिनांक २९/२/२०१६ रोजी दु. १२.१५ वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव - अध्यक्ष
२. मा.भाऊसाहेब भोईर
३. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
४. मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन
५. मा.को-हाळे अनंत सुभाष
६. मा.गावडे जयश्री वसंत
७. मा.विमलताई जगताप
८. मा.बारणे निलेश हिरामण
९. मा.झामाबाई बाळासाहेब बारणे
१०. मा.माया संतोष बारणे
११. मा.शेखर अशोक ओव्हाळ
१२. मा.कलाटे स्वाती मयूर
१३. मा.शरद माणिकचंद लुणावत स्वीकृत सदस्य
१४. मा.गोरक्ष दशरथ पाषाणकर स्वीकृत सदस्य

खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.सुभाष माछरे – क्षेत्रिय अधिकारी ,मा.रविंद्र जाधव प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा, मा. देवण्णा गट्टुवार - कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, मा.शशिकांत मोरे – कार्यकारी अभियंता, विदयुत विभाग, मा.भाऊसाहेब साबळे, उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.सी.एन.धानोरकर – उपअभियंता, स्थापत्य , मा.के.डी.फुटाणे – उप अभियंता स्थापत्य विभाग, मा.सी.बी.कोंडे – उपअभियंता, स्थापत्य, मा.एन.आर.निंबाळकर – उपअभियंता स्थापत्य, मा.संध्या वाघ, उपअभियंता , स्थापत्य, मा.मिनानाथ इनामदार – लेखाधिकारी, श्री.के.डी.दरवडे, सहा.आरोग्याधिकारी, मा.गणेश देशपांडे, मुख्य आरोग्य निरिक्षक इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

अ) तदनंतर मागील कार्यपत्रिका क्र. ११, दि. २९/१/२०१६ रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.अध्यक्ष यांनी प्रकट केले.

तदनंतर **उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्रमांक ३ कै.शिवाजी उर्फ नाना रामभाऊ भोईर यांचे नांव मोरया गोसावी स्टेडियम मधील बांधण्यात आलेल्या रुमला देण्यात आले आहे. त्या शेजारील खोलीमध्ये योगा प्रतिष्ठानच्या वतीने सांप्रदायिक कार्यक्रम , बालसंस्कार वर्ग, व महिलांसाठी रोज योगाचे वर्ग चालु आहेत. तरी सदरची रुम (खोली) ही योगदान प्रतिष्ठान यांना नाममात्र भाडेतत्वावर देण्यास तसेच सर्व अटी व शर्ती सदर प्रतिष्ठानला मान्य रहातील. सबब सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.भाऊसाहेब भोईर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ४ चिंचवडेनगर प्रभाग क्रमांक २० मध्ये रस्टन कॉलनीतील कमानीस रस्टन ग्रिव्हज हौसिंग सोसायटी असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.आशाताई सुर्यवंशी यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ५ प्रभाग क्रमांक ५० थेरगांव गांवठाण पदमजी पेपरमील मधील पवना नदी काठी थेरगांव स्मशानभुमीत नवीन पत्राशेड बनविण्यासाठी दशक्रिया विधी हॉलजवळ दोन्ही बाजुने उतरत्या पध्दतीने शेड बनविण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.झामाबाई बारणे यांचा प्रस्ताव.

ठराव क्र. ७५ — विषय क्र. १
दि. २९/२/२०१६ — विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा. झामाबाई बारणे — अनुमोदक: मा.निलेश बारणे

संदर्भ :- मा. झामाबाई बारणे यांचा दिनांक १७/६/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

विषय :- थेरगांव येथील स.नं.२२/५ मधील क्षेत्र १ हेक्टर ०० आर या मिळकतीचा आगाऊ ताबा पिंपरी चिंचवड मनपास अ, ब पत्राव्दारे ज्या जमीन मालकाच्या मालकीची जमीन त्यांनी आरक्षण क्रमांक ६२८ खेळाचे मैदानसाठी दिलेले आहे. सदर खेळाचे मैदानास कै.रामभाऊ मोरु बारणे व कै.बारकु मोरु बारणे असे नांव देवून नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ७६ — विषय क्र. २
दि. २९/२/२०१६ — विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा. माया संतोष बारणे — अनुमोदक: मा. स्वाती कलाटे

संदर्भ :- मा. माया संतोष बारणे यांचा दिनांक २०/११/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ५१ गणेशनगर – बेलठिकानगर थेरगांव या परिसरातील रस्त्यास पंचशिल कॉलनी क्रमांक १ डॉ.बाबासाहेब आंबेडकर पथ, २. पंचशिल कॉलनी क्रमांक २ ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पथ, ३. समर्थ कॉलनी गणेशनगर, थेरगांव, ४. मयुरबाग कॉलनी गणेशनगर, वाकडरोड, थेरगांव असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ७७ विषय क्र. ३
दि. २९/२/२०१६ विभाग - क्रिडा विभाग
सुचक : मा. भाऊसाहेब सोपानराव भोईर अनुमोदक: मा. आशाताई सुर्यवंशी

संदर्भ :- मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर यांचा दिनांक २९/२/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

कै.शिवाजी उर्फ नाना रामभाऊ भोईर यांचे नांव मोरया गोसावी स्टेडियम मधील बांधण्यात आलेल्या रुमला देण्यात आले आहे. त्या शेजारील खोलीमध्ये योगा प्रतिष्ठानच्या वतीने सांप्रदायिक कार्यक्रम , बालसंस्कार वर्ग, व महिलांसाठी रोज योगाचे वर्ग चालु आहेत. तरी सदरची रुम (खोली) ही योगदान प्रतिष्ठान यांना नाममात्र भाडेतत्वावर देण्यास तसेच सर्व अटी व शर्ती सदर प्रतिष्ठानला मान्य रहातील. सबब सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ७८ विषय क्र. ४
दि. २९/२/२०१६ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा. आशाताई सुर्यवंशी अनुमोदक: मा. भाऊसाहेब सोपानराव भोई

संदर्भ :- मा.आशाताई सुर्यवंशी यांचा दिनांक २९/२/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

चिंचवडेनगर प्रभाग क्रमांक २० मध्ये रस्टन कॉलनीतील कमानीस रस्टन ग्रिव्हज हौसिंग सोसायटी असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ७९ विषय क्र. ५
दि. २९/२/२०१६ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा. झामाबाई बारणे अनुमोदक: मा.निलेश हिरामण बारणे

संदर्भ :- मा.झामाबाई बारणे यांचा दिनांक २९/२/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ५० थेरगांव गांवठाण पदमजी पेपरमील मधील पवना नदी काठी थेरगांव स्मशानभुमीत नवीन पत्राशेड बनविण्यासाठी दशक्रिया विधी हॉलजवळ दोन्ही बाजुने उतरत्या पध्दतीने शेड बनविण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
[ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/१३८/२०१६.
दिनांक : ११ / ०३ /२०१६

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना